IQAC

## 'निर्भय कन्या कार्यशाळा' अहवाल

## दिनांक - 23.3.2022

## विषय – महिला सुरक्षितता

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: SL-332
दिनांक: 28 MAR 2022

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने 'निर्भय कन्या कार्यशाळेचे' आयोजन दिनांक 23 मार्च 2022 रोजी प्रशासन भवन सभागृहात केले होते.

'निर्भय कन्या कार्यशाळा' कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस हवालदार सौ.अमृता भोईटे मॅडम उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महिला सक्षमीकरण समिती प्रमुख व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.सीमा नाईक गोसावी यांनी भूषविले. प्रमुख वक्त्या सौ.अमृता भोईटे मॅडम यांनी महिला सुरक्षितता या विषयावर आपले मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये निर्भया पथक निर्माण करण्यामागचा उद्देश मुलींना सक्षम बनविणे, मुलींच्या छेडछाड प्रकरणांचा तपास करणे, याविषयी मार्गदर्शन केले. विषय- एक तर्फी प्रेम, व्यसनाधीनता, आई-वडिलांकडे दुर्लक्ष, चुकीच्या सवयी, मित्र संगती, चोरी गुन्हेगारीकडे वळणारी मुले, विकृत मानसिकतेचे मुले, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मुलेमुली पोलिसांची सुरक्षाव्यवस्था, कायदे व त्यांची अंमलबजावणी या विषयी मार्गदर्शन केले. तसेच वेगवेगळ्या घटनांची उदाहरणे देऊन गुन्ह्याचे प्रकार सांगितले मुलींना सक्षम बनवण्यासाठी निर्भया पथकाद्वारे कशाप्रकारे वेगवेगळे उपक्रम हाती घेतले जातात. तसेच विविध प्रकारच्या केसेस कशा सोडवल्या जातात. याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षण घेत असताना धेय्य निश्चित करून शिकले पाहिजे. त्याप्रमाणे समाजातील आजूबाजूच्या परिस्थितीचे भान राखून एक सुजाण नागरिक बनण्यासाठी ज्ञानसंपादन व ग्रहण केले पाहिजे. तसेच महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी जे वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात त्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यानंतर प्रमुख वक्ते व उपस्थित विद्यार्थी- विद्यार्थिनीसोबत प्रश्नोत्तरांचा संवाद झाला यामध्ये अनेक विद्यार्थिनींनी आवर्जून आपल्या शंका विचारल्या या शंकांचे निरसन त्यांनी केले.

सदर कार्यशाळेसाठी मराठी विभाग प्रमुख डॉ.रंजना नेमाडे आवर्जून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा.डॉ.भगवान माळी यांनी केले. डॉ.माधुरी पाटील यांनी आभार मानले संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ऋतिका गणेश शिंदे हिने केले. 73 विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मा.प्राचार्य यांना अहवाल सादर.

डॉ.सीमा नाईक- गोसावी
महिला सक्षमीकरण समिती
प्रमुख

Noted
MBS
copy IQAC
28/3

डॉ.भगवान माळी
विद्यार्थी विकास मंडळ
अधिकारी

28/3/22




Activity Time






सायबर सेक्युरिटी - काळाची गरज


Maharshi Karve Stri Shikshan Samstha's
Baya Karve Women's Study and Research Centre
Gender Sensitization Campaign
लिंगभाव संवेदनीकरण अभियान





Gender Sensitization Campaign
लिंगभाव संवेदनीकरण अभियान


GLOBUS

